दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : २८ वा ▶ शनिवार दि. २ डिसेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे



डेली सर्व्हिस - इंदौर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, नागपूर, अमरावती, अकोला

लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.

2x1 A/C स्लीपर कोच

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### हॉटेलमध्ये तोडफोड; चालकाला मारहाण

**धुळे ।** हॉटेलवर बसू नको, असे सांगितल्याच्या रागातून एकाने हॉटेलवर तोडफोड करीत चालकाला मारहाण केली. नेर (ता. धुळे) येथे ही घटना घडली. गोपाल सोमनाथ चौधरी (रा. कुसुंबा ) या हॉटेल व्यावसायिकाच्या फिर्यादीनुसार त्यांच्या मालकीच्या नेर (ता. धुळे) येथील हॉटेल रॉलय पॅलेसवर २७ नोव्हेंबरला रात्री दहाच्या सुमारास रवी ओंकार पवार (रा. नेर) हॉटेलवर होता. मी हॉटेल बंद करीत आहे. तू हॉटेलवर बसू नको, असे चौधरी यांनी सांगताच पवार याने टेबल-खुर्च्यांची तोडफोड केली. चौधरी यांना काचेची बाटली फेकून मारत जखमी केले. याबाबत धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### शिरपूर येथे तरुणाची गळफासाने आत्महत्या

**शिरपूर ।** शहरातील पाटीलवाडा येथे २७ वर्षीय तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना २९ नोव्हेंबरला रात्री घडली. कमलेश रवींद्र कलाल असे त्याचे नाव आहे. घराच्या छताला असलेल्या कडीला दोराने गळफास लावून त्याने आत्महत्या केली. त्याला मामासह नातलगांनी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

# शरद पवारांनीच सत्तेत जाण्यास सांगितले अजित पवारांचा मोठा गौप्यस्फोट

**कर्जत । प्रतिनिधी**



**सातत्याने गाफिल ठेवले**

**या अधिवेशनात पुढे बोलताना अजित पवार यांनी थेट शरद पवार यांच्यावरच हल्ला चढवला. आम्हाला सातत्याने गाफिल ठेवण्यात आलं. आम्ही १०-१२ जण होतो. देवगिरीला बसलो होतो. आम्ही काय करायचा विचार सुरू होता. थेट साहेबांना सांगितले तर काय वाटेल असं वाटल्याने आम्ही सुप्रियाला माझ्या घरी बोलावले, असे अजितदादा म्हणाले.**

कर्जत येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी थेट राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यावरच हल्ला चढवत अनेक गौप्यस्फोट केले आहेत. तसेच यावेळी त्यांनी शरद पवार यांच्या धरसोड वृत्तीवर जोरदार टीका केली आहे. सरकारसोबत जा, मी राजीनामा देतो असे शरद पवार म्हणाल्याचा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केला आहे.

या अधिवेशनात पुढे बोलताना अजित पवार यांनी थेट शरद पवार यांच्यावरच हल्ला चढवला. आम्हाला सातत्याने गाफिल ठेवण्यात आलं. प्रफुल्ल पटेल, अजित पवार, छगन भुजबळ, तटकरे, जयंत पाटील, अनिल देशमुख, रामराजे नाईक निंबाळकर, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे आम्ही १०-१२ जण होतो. देवगिरीला बसलो होतो. आम्ही काय करायचा विचार सुरू होता. थेट साहेबांना सांगितले तर काय वाटेल असं वाटल्याने आम्ही सुप्रियाला माझ्या घरी बोलावले, असे अजितदादा म्हणाले. आम्ही सुप्रियाला चर्चे साठी बोलावले आणि सांगितले लोकशाहीत बहुमताचा आदर करावा लागतो. तरच संघटना पुढे जाते. ती म्हणाली, ''मला सात ते दहा दिवस द्या. मी साहेबांना कन्व्हिन्स करते. काय करायचं ते माझ्यावर सोपवा''. त्यानंतर आम्ही सात-आठ दिवस थांबलो. पुन्हा आम्ही एकत्र बसलो. सरकारमध्ये गेलं पाहिजे. आमदारांच्या कामाला स्थगिती मिळाली आहे. अनेक प्रश्न आहे. बहुजन समाज आणि अल्पसंख्यांकाचा विचार झाला पाहिजे. याचा विचार यावेळी आम्ही केला, अशी माहिती अजित पवार यांनी दिली. त्यानंतर आम्ही थेट साहेबांकडे गेलो. त्यांना आमचा निर्णय सांगितला. यावर ते म्हणाले ठीक आहे. बघू काय करायचे ते. पुन्हा आम्ही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाणला गेलो. आम्ही म्हटलं वेळ जातोय निर्णय घ्या. तेव्हा शरद पवारांनी मला बोलावून सांगितलं की, सरकारमध्ये जा. मी अध्यक्षपदाचा राजीनामा देतो. १ मे रोजी आम्ही झेंडा वंदनाच्या कार्यक्रमात होतो. नंतर २ तारखेला पुस्तक प्रकाशन होणार होते अशी माहिती अजित पवारांनी दिली.

# शौर्यदिनावर सावट आणू नका

## आझाद समाज पक्षाचे जरांगे पाटलांना आवाहन

**धुळे । प्रतिनिधी**



सध्या राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न मोठ्या चर्चेचा बनला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथून सुरु केलेल्या आंदोलनाला जनआंदोलनाचे स्वरूप सकल मराठा समाजाने दिले आहे. मनोज जरांगे पाटीलांनी सरकारचे वायदे व तारखांना आजमावून पाहिल्याने काहीही फायदा होत नसल्याचे लक्षात येताच आता राज्यभर दौरे सुरु केले आहेत. मराठा आरक्षणाचा विषय धुमसत ठेवून जरांगेंनी सरकारला २४ डिसेंबर २०२३ ही अंतिम मुदत दिली आहे. महाराष्ट्र सरकार तुम्हाला २ जानेवारी सांगत होते. परंतु तुम्ही २४ डिसेंबर या तारखेवर अडून बसला आहात. त्यामुळे हे आंदोलन वेगळ्या वळणावर जाईल. मराठा आरक्षण आंदोलनाला आजाद समाज पार्टीचा पाठिंबाच आहे. एवढेच काय कोणत्याही प्रवर्गाच्या आरक्षणाला आमचा विरोध नाही. परंतु जरांगे पाटीलांनी सरकारला दिलेल्या २४ डिसेंबरच्या मुदतीबाबत काही महत्वाच्या बाबींकडे आझाद समाज पक्षाने लक्ष वेधले आहे.

**आंदोलनाची दिशा ठरवा**

**२४ डिसेंबरच्या मुदतीबाबत ताठर भूमिका घेतल्यास कपाळमोक्षच होईल आणि होणार्या परिणामांची जबाबदारी मनोज जरांगे पाटील यांच्या माथी मारली जाईल. याबाबतीत आपण आमच्या आझाद समाज पार्टीच्या पदाधिकाऱ्याशी धुळ्यातील आपल्या दौऱ्या दरम्यान चर्चा करून धुळे येथील जाहीर सभेत याबाबत स्पष्टीकरणही द्यावे. म्हणून आजाद समाज पार्टीचे जरांगे पाटीलांना जाहीर आवाहन आहे की जरा लक्षपूर्वक विचार करून आपल्या आंदोलनाची दिशा ठरवा व योग्य परिणाम साधू शकेल असे देखील पत्रकात म्हटले आहे.**

यासंघर्षातून आरक्षणाचा प्रश्न चिघळण्याची शक्यता आहे. दंगली घडविण्याचा देखील डाव असू शकतो. किंबहुना मराठा आरक्षण आंदोलन दडपण्याचे कटकारस्थत्तान देखील असू शकते.म्हणून जरांगे पाटलांनी २४ डिसेंबरची मुदत ५ जानेवारीपर्यंत पुढे नेली तर मराठा आरक्षण आंदोलनाला एक निश्चित दिशाप्राप्त होईल असे आनंद लोंढे यांनी पत्रकात नमुद केले आहे.

# उशिरा येणाऱ्या १० कर्मचाऱ्यांना दणका

**धुळे । प्रतिनिधी**




जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी शुक्रवारी कामावर उशिरा येणाऱ्या १० कर्मचाऱ्यांना कार्यालयाबाहेर थांबवून आपल्या प्रशासकीय कामकाजाचा पहिला धक्का दिला. कार्यालयीन वेळेचे महत्व अधोरेखीत करतांना त्यांनी सामान्यांच्या पोलीस प्रशासनाकडून दैनंदिन अपेक्षांची पूर्तता करण्यावर विशेष भर दिला आहे.

अधीक्षक कार्यालयाच्या इमारतीत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, वाचक शाखा,आस्थापना विभाग यांसह अनेक शाखा आहेत. हा प्रत्येक विभाग स्वतंत्र असला तरी तो जिल्हा अधीक्षकांच्याच अधिपत्याखाली आहे. यापैकी सामान्यांसाठी दैनंदिन सेवा उपलब्ध करून देणाऱ्या विभागातील प्रमुखांसह अन्य कर्मचाऱ्यांची कार्यालयीन वेळेत उपस्थिती अनिवार्य आहे. यामुळे अधीक्षक धिवरे यांनी शुक्रवारी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे मोर्चा वळवला. कार्यालयातील दैनंदिन कामकाज वेळेत पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी यापूर्वीच संबंधितांना दिले होते. असे असतांना अनेकजण कार्यालयात उशिरा येत असून सायंकाळी लवकर घरी निघून जातात, असे अधीक्षक धिवरे यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी शुक्रवारी अचानक उशिरा येणाऱ्यांसाठी कार्यालयाचे दरवाजे तूर्त बंद करण्याचे आदेश दिले. बाहेरच थांबविण्यात आल्याने उशिरा येणारे कर्मचारी बुचकळ्यात पडले. मुख्य प्रवेशद्वारासमोर घुटमळण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय उरला नाही. नंतर कडक शब्दांत समज देऊन त्यांना कामावर हजर होण्याचा आदेश देण्यात आला.

# अद्वय हिरेंनंतर मोठे बंधू अपूर्व यांच्यावरही गुन्हा दाखल

**नाशिक । प्रतिनिधी**

रेणुका सूत गिरणी कर्ज फसवणूक प्रकरणी मालेगाव न्यायालयाने



शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांचा जामीन अर्ज फेटाळला. नाशिकच्या अद्वय हिरेंनंतरमोठे बंधू अपूर्व हिरेंवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ कोटी ५६ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. महात्मा गांधी विद्यामंदिर आणि अदिवासी सेवा समिती या संस्थेच्या अनुदानाचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे.

ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांचा एकीकडे मालेगाव न्यायालयाने जामीन फेटाळल्याने त्यांचा न्यायालयीन कोठडीतील मुक्काम वाढलेला आहे. दुसरीकडे नाशिक शहरातील भद्रकाली पोलीस ठाण्यात अद्वय यांच्यासह त्यांचे मोठे बंधू आणि अजित पवार गटाचे पदाधिकारी माजी आमदार अपूर्व हिरे यांच्यावर पुन्हा फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. त्यानंतर हिरे कुटुंबीयांच्या अडचणीत चांगलीच वाढ झाली आहे. शिक्षण संस्थेला मिळत असलेल्या नीती आयोगाच्या निधीत अपहार केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. माध्यमिक शिक्षणाधिकारी उदय देवरे यांच्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धुळ्यात रेशन दुकानदारांची निदर्शने

**धुळे । प्रतिनिधी**



स्वस्त धान्य दुकानदार आणि केरोसीन परवाना धारकांनी एकदिवसीय देशव्यापी आंदोलन पुकारले असून धुळ्यातही क्युमाईन क्लबसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

संघटनेच्यावतीने जिल्हा प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले असून त्यात म्हटले आहे की, धान्य वाटपाचे कमिशन वेळेवर मिळत नाही, धान्य वाहतूकीच्यावेळी नासाडी होते. त्यामुळे दुकानांवर माल उतरवताना मोजून मिळावा, अनेकदा सर्व्हर डाऊन असते, बोटांची जुळवणी होत नाही; अशावेळी लाभार्थ्यांसोबत वादाचे प्रसंद उद्भवतात, म्हणून वितरण प्रणाली सुरळीत करण्याचा पर्याय निवडावा, विश्व खाद्य कार्यक्रम रिपोर्टनुसार लागू करावा, वाधवा आयोगाने सुचविल्यानुसार शहरी भागातील दुकानदारांना पन्नास हजार व ग्रामीणभागात तीस हजार रूपयांचे मासिक मानधन मिळावे. यासह करोना काळात मयत झालेले परवानाधारकांच्या वारसांना राज्य शासनाने आर्थिक मदत करावी. आंदोलनात संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, उपाध्यक्ष भाईदास पाटील, धुळे तालुकाध्यक्ष विलास चौधरी, साक्री तालुका अध्यक्ष प्रवीण खैरनार, शिंदखेडा तालुका अध्यक्ष आर. आर. पाटील, शिरपूर तालुका अध्यक्ष राजू टेलर, शामजी महाले, व्ही.व्ही. खैरनार, मनोहर पाटील, रविंद्र गिरासे, मनीष परदेशी, महेश अग्रवाल, अजीज मन्सुरी, रूपेश जैन आदी सहभागी झाले होते.

# ओबीसीतच आरक्षण घेणार, सुट्टी देणार नाही

## जरांगेंचे भुजबळ आणि राज्य सरकारला आव्हान

**जालना । प्रतिनिधी**

राज्य सरकारने कुणा एकट्याच्या दबावाखाली येऊन जर मराठ्यांशी दगाफकटा केला तर सुट्टी देणार नाही असं थेट आव्हान मनोज जरांगे यांनी दिलं. गेल्या ७० वर्षांपासून आम्ही कष्ट करतोय आणि त्यांच्यावर अन्याय केला जातोय, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना शेवटचं सांगतोय, मराठ्यांना आरक्षण द्या, अन्यथा परिणामांना सामोरं जा असा इशाराही त्यांनी दिला. मराठ्यांना आरक्षण घेणार आणि तेही ओबीसीमधूनच घेणार, त्याला काय करायचं ते कर असा इशारा जरांगे यांनी छगन भुजबळ आणि राज्य सरकारला दिला.

दरम्यान मनोज जरांगे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटणार नाही. मंत्री छगन भुजबळांकडून घटनात्मक पदावर बसून जातीयवाद केला जात आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. तर भुजबळांच्या आक्षेपार्ह वक्तव्यावर सरकार गप्प का बसले आहेत असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तर मी जातीयवाद करत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. आमच्या लोकांना अटक करणार सरकार विश्र्वासघातकी आहे. मुख्यमंत्री, गृहमंत्री यांनी काय डाव रचला आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. भारतात आतापर्यंत महापुरुषांच्या कुणी जाती काढल्या काय? आपण अरेतुरे कुणाला म्हणतो, आपल्यापेक्षा लहान वयाच्या माणसाला, आणि उंचीचा असला तर त्याला अहो-जाहो म्हणतो. तुम्ही आम्हाला खेटू नका, खोटे बोलून आमच्याशी गद्दारी करु नका. तुम्ही जाहीरपणाने सांगितले होते गुन्हे मागे घेतले जातील, कुणालाही अटक केली जाणार नाही. तुम्ही आमच्या लोकांना अटक का केली? त्याचे एकट्याच ऐकून, तो हिंगोलीला बोलला एमसीआर दिला म्हणून पीसीआर दिला का? तुम्ही पुन्हा डाव रचू नका, असे जरांगे यांनी म्हटले आहे.

## केंद्रीय निवडणूक आयोगाला समन्स पाठवा

**मुंबई ।** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार घटनेचा विचार करून अध्यक्षांना विभाजनापूर्वी पक्ष कोणाचा हे ठरवायचे आहे. त्यामुळे पक्ष कोणाचा हे ठरवण्याची जबाबदारी माझी नाही, आम्ही फक्त सहकार्य करत आहोत, असा युक्तिवाद देवदत्त कामत यांनी केला.समन्स पाठवून त्यांना उलट तपासणीसाठी बोलवले जात असेल तर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मर्यादित वेळेत निर्णय देणे कठीण जाईल असे अध्यक्षांनी भूमिका मांडली आहे. तसेच निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना सुनावणीला बोलावण्यासाठी समन्स पाठवावे, असेही पत्रामध्ये म्हणले आहे.

# आर्वी येथील दरोड्याचा ४८ तासातच लावला छडा

## धुळे तालुका पोलीसांची दमदार कामगिरी; आठ जण अटकेत

**धुळे । प्रतिनिधी**


लुटारुंच्या शर्यतीतून वाहनचालकांचा प्रवास थांबणार कधी?
पोलीस प्रशासन काय भूमिका घेणार?




**लक्ष महाराष्ट्र दणका**

**मुंबई आग्रा महामार्गावरील लूटमारीचे प्रकार सातत्याने वाढत आहेत, याबाबत दै.लक्ष महाराष्ट्र मध्ये पोलीस प्रशासन लक्ष देईल का याबाबतच वृत्त प्रकाशित झाले होते. धुळे तालुका पोलिसांनी तपासाला वेग देत तात्काळ आठ जणांना अटक केली, त्यांची कामगिरीचे निश्चितच स्वागत आहे, या कारवाईने निश्चित चोरट्यांवर चाप बसेल परंतु त्यात यापुढेही सातत्य असणे अपेक्षित आहे.**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीनवर आर्वी (ता. धुळे) शिवारात दरोडयाचा गुन्हा उघडकिस आणून ०५ लाख ७९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल धुळे तालुका पोलीसांनी हस्तगत केला. अवघ्या ४८ तासातच गुन्ह्याचा उलगडा केला असून आठ जणांना अटक केली.

२७ नोव्हेंबर सायंकाळी सातच्या सुमारास हितेश शंकर पाटील, त्यांचा मित्र रोहित निंबा घोरपडे (दोन्ही रा. आर्वी ता. धुळे) दोघे मोटार सायकलने (एम एच १८/सीबी३६०७) धुळे कडून आर्वीकडेस जात होते. रोकडोबा हनुमान मंदीराचे अगोदर उतारावर पल्सर मोटार सायकलींने चार अनोळखी इसमांनी तक्रारदार यांची मोटारसायकल ओव्हरटेक करुन अडविली होती.दरोडयाची घटना घडली होती. या प्रकरणी २ संशयीतांना ताब्यात घेतले. विचारपूस केली असता त्यांनी गुन्हयाची त्यांच्या साथीदारांचीही कबुली दिली. उज्जैन फकिरा गायकवाड, दादू विठ्ठल सोनवणे, राहूल रमेश सुर्यवंशी, गोकूळ श्रावण आहीरे, बादल राजू मोरे,अनिल हिरामन सोनवणे,प्रकाश खंडू सोनवणे यांना गुन्हयात अटक केली. एकुण ५ लाख ७९ हजार ५०० रुपयांचा माल जप्त केला.

# किसान काँग्रेसतर्फे किसान संवाद यात्रेचे ४ व ५ डिसेंबरला आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत प्रदेश किसान काँग्रेसच्यावतीने धुळे जिल्हयात दि.४ आणि ५ डिसेंबर रोजी शेतकरी संवाद यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. नंदुरबार जिल्हयातील संवाद यात्रेचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ.नाना पटोले यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून यावेळी नंदुरबार येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे.त्यानंतर नंदुरबार जिल्हयातून आलेल्या सिंदबंद ता.साक्री येथून या संवाद यात्रेला प्रारंभ होणार आहे. तरी जिल्हयातील शेतकरी व नागरीकांनी या संवाद यात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन धुळे जिल्हा किसान काँग्रेस व जिल्हा काँग्रेसच्यावतीने करण्यात आले आहे.

शेतकरी संवाद यात्रेच्या नियोजनासाठी माजी मंत्री रोहिदास पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत देवपूर धुळे येथील संपर्क कार्यालयात काँग्रेस व किसान काँग्रेसच्या पदाधिकार्यांची बैठक घेण्यात आली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात आहे. पिक विम्याची रक्कम अजूनही मिळाली नाही. तरीही शेतकर्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला सरकार तयार नाही. शेतकर्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी प्रदेश किसान काँग्रेसतर्फे शेतकरी संवाद यात्रा होणार आहे. दि.११ डिसेंबर रोजी संवाद यात्रेचे रुपांतर मोर्चात होवून नागपूर येथे विधानभवनावर शेतकरी आक्रोश मोर्चा काढला जाणार आहे. दि.४डिसेंबर रोजी नंदुरबार येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते संवाद यात्रेचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर नंदुरबार येथून निघालेल्या संवाद यात्रेचे सोमवार दि.४ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५ वा.सिंदबंद ता.साक्री येथे संवाद यात्रेचे आगमन होणार आहे.त्यानंतर संध्याकाळी ५.३० वा.छडवेल कोर्डे येथे स्वागत व कार्नर सभा,टीटाणे फाटा, जैताणे येथे स्वागत तर निजामपूर येथे संध्या.७ वा. सभा होणार आहे.बळसाणे ता.साक्री येथे रात्री ९ वा.मुक्काम होणार आहे. सोमवार दि.५डिसेंबर रोजी बळसाणे येथून शेतकरी संवाद यात्रा मार्गस्थ होवून कढरे,लोणखेडी,लामकानी येथे पोहचणार आहे. दु.३ वा.चिंचवार ता.धुळे येथे शेतकरी संवाद यात्रेचे स्वागत व विश्रांती होणार आहे.त्यानंतर दु.४ वा.धुळे तालुक्यातील मेहेरगाव,निमडाळे,गोंदूर येथे स्वागत करण्यात येणार आहे. संध्या.७ वा. वलवाडी-भोकर येथे शेतकरी संवाद यात्रेच्या समारोप सभेचे आयोजन केले जाणार आहे. तरी जिल्हयातील शेतकरी,शेतमजुर,नागरीकांनी शेतकरी संवाद यात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन काँग्रेस व किसान काँग्रेसच्यावतीने करण्यात आले. संवाद यात्रेच्या नियोजन बैठकिला माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील,माजी.खा.बापू चौरे,माजी आ.डि.एस.अहिरे, किसान काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष उत्तम बापू देसले,काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर,शहराध्यक्ष डॉ.अनिल भामरे,काँग्रेस तालुकाध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे,भानुदास गांगुर्डे,शाम भामरे, बाजीराव पाटील, गुलाबराव कोतेकर,भगवान गर्दे,पंढरीनाथ पाटील,प्रकाश पाटील, आदी उपस्थित होते.

# नाणे-सिताणे शिवारात दोन बछड्यांसह आढळली मादी

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील नाणे-सिताणे शिवारात काल रात्री दोन बछड्यांसह मादी आढळून आल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण आहे. सदर मादी सीसीटीव्हीत कैद झाली असून तिचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. यासंदर्भात दुपारी युवासेनेच्या नेतृत्वात वन विभागाच्या अधिकार्यांना निवेदन देण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, नाणे-सिताणे शिवारात काल सायंकाळी लहान मुले खेळत असताना त्यांना शेतात दोन बछडे दिसले. याबाबत त्यांनी घरी पालकांना सांगितले. पालकांनी शेतात येवून पाहिले असता त्यांना सदर बछडे बिबट्याचे असल्याचे निदर्शनास आले. बछड्यांची मादीही याच परिसरात असल्याची शक्यता असल्याने कर्मचार्यांनी रात्री दोघा बछड्यांना शेतात सीसीटीव्हीच्या निगराणीत ठेवले. रात्री १०.३० वाजेच्या सुमारास मादी येवून दोघा बछड्यांना घेऊन गेली. ही बाब सीसीटीव्हीत कैद झाली. सदर मादीमुळे ग्रामस्थांच्या जिवीताला धोका आहे. याबाबत माहिती मिळताच युवासेनेचे जिल्हाध्यक्ष हरिष माळी, विस्तारक कुणाल कानकाटे आदी पदाधिकार्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

## प्रभावी आणि वादग्रस्त

अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणावर आपला प्रभाव असावा व जगात अमेरिकेचे वर्चस्व असावे हा किसिंजर यांचा हेतु काही काळ यशस्वी झाला; पण श्रीमती इंदिरा गांधी यांच्याकडून पराभव झाल्याचे शल्य त्यांना डाचत होते.

अमेरिकेचे माजी परराष्ट्र मंत्री हेन्री किसिंजर हे कुशल राजनैतिक अधिकारी होते यात वाद नाही. आताच्या पिढीला त्यांचे नाव माहीत नसेल; पण ७०च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणात किसिंजर यांचा दबदबा होता. दोन अध्यक्षांच्या कारकिर्दीत किसिंजर यांनी राष्ट्रीय संरक्षण सल्लागार आणि परराष्ट्र मंत्री ही दोन पदे सांभाळली. असे करणारे ते एकमेव राजनैतिक अधिकारी ठरले. तो काळ अमेरिका व रशियातील शीत युद्धाचा होता. अमेरिकेची प्रत्येक कृती जगावर परिणाम करत असे. त्या काळात हेन्री किसिंजर अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री होते. व्हिएटनाममध्ये त्यांच्याच कारकिर्दीत युद्ध अधिक तीव्र व रक्तरंजित झाले. खूप प्रयत्न करूनही अमेरिकेस त्या युद्धात पराभव व नाचक्की सहन करावी लागली होती. भारतीयांना किसिंजर माहीत आहेत ते १९७१ च्या बांगला देशाच्या युद्धात अमेरिकेने घेतलेल्या पाकिस्तान धार्जिण्या भूमिकेमुळे. त्यावेळी रशिया एकत्र होता व तेथे साम्यवादी (कम्युनिस्ट) राजवट होती. अमेरिकेचा त्यास विरोध होता. त्या काळात रशिया भारताचा मित्र होता. त्यामुळे अमेरिकेने भारतविरोधी भूमिका घेतली होती. याही युद्धात अमेरिकेच्या पदरी निराशा पडली होती. साम्यवादास अमेरिकेचा कडाडून विरोध असला तरी रशियाशी त्यांनी थेट चर्चा घडवून आणली होती आणि माओ यांनाही ते भेटले होते.

मानवी हक्कांचे उल्लंघन

हेन्री किसिंजर यांनी उच्च शिक्षण हार्वर्ड विद्यापीठात पूर्ण केले. तेथेच ते अध्यापनही करू लागले. नंतर 'रॉकफेलर ब्रदर्स फंड' या संस्थेत ते महत्त्वाच्या पदावर होते. अमेरिकन सरकारशी त्यांचा या काळात सल्लागार या नात्याने संबंध येत होता. देशाच्या परराष्ट्र धोरणावर आपली पकड असावी, असे त्यांना तेव्हाही वाटत होते. प्रसिद्ध उद्योगपती नेल्सन रॉकफेलर यांनी १९६० ते ६८ या काळात तीनदा रिपब्लिकन पक्षातर्फे अध्यक्षपदाची उमेदवारी मिळवण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी किसिंजर त्यांचे परराष्ट्र धोरण विषयक सल्लागार होते. रॉकफेलर यांचे प्रतिस्पर्धी रिचर्ड निक्सन यांचा उल्लेख ते 'अतिशय धोकादायक व्यक्ती' असा करत असत. मात्र निक्सन यांना उमेदवारी मिळाली व ते अध्यक्षही बनले. लगेचच किसिंजर यांनी आपली भूमिका बदलून निक्सन यांच्याशी जुळवून घेतले. किसिंजर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बनले. दोघांचे संबंध अत्यंत घनिष्ट होते. त्या काळात परराष्ट्र खात्याला दुय्यम दर्जा देऊन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार व अध्यक्ष गुप्ततेने निर्णय घेत असल्याचा आरोपही नंतर झाला. व्हिएटनाम युद्धाच्या काळातच जवळच्या कंबोडियात यादवी सुरु होती. तेथे बॉम्बफेक करण्याचा निर्णय निक्सन यांनी याच गुप्ततेच्या स्वभावातून घेतला. उत्तर व्हिएटनाम हे कम्युनिस्ट विचारांचे असल्याने त्या युद्धात अमेरिका उतरली. अमेरिकेच्या लष्कराने 'नापाम' बॉम्बसारखी अत्यंत घातक शस्त्रे तेथे वापरली. बांगला देशात पाकिस्तानने हत्याकांड घडवले तेव्हाही ते गप्प बसले. दक्षिण अमेरिकेतील हुकूमशहांना त्यांचा छुपा पाठिंबा होता. या सर्व घटनांत असंख्य नागरिकांची हत्या झाली होती. यामुळे किसिंजर यांच्यावर मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याचे आरोप झाले. त्यामुळेच त्यांना १९७३ मध्ये 'शांततेचे नोबेल' पारितोषिक जाहीर झाले ते वादग्रस्त ठरले. नोबेल समितीच्या दोघांनी राजीनामा दिला. १९७१ च्या युद्धाच्या काळात तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्याशी भेट झाल्यानंतर निक्सन व किसिंजर यांच्यात जे संभाषण झाले त्याची ध्वनिफीत २००५मध्ये अमेरिकेने जाहीर केली. श्रीमती गांधी व भारतीय यांना उद्देशून दोघांनीही अपशब्द वापरले होते. राजनैतिक संकेतांचा तो भंग तर होताच; पण भारतीयांविषयीची त्यांची हीन दर्जाची मानसिकताही दिसली. 'वॉटरगेट' प्रकरणानंतर निक्सन यांना राजीनामा द्यावा लागला. जेराल्ड फोर्ड अध्यक्ष झाल्यावरही किसिंजर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार व परराष्ट्र मंत्रिपदी टिकले; पण त्यांची राजकीय ताकद थोडी कमी झाली होती. रशिया व अमेरिकेत अण्वस्त्रांची संख्या मर्यादित ठेवण्याचा करार त्यांच्या पुढाकाराने झाला, यातून त्यांची प्रभावी मुत्सद्देगिरी दिसली. तरी किसिंजर हे शांतिदूत नक्कीच नव्हते.

# आत्महत्या करणे ही सुटका नाहीच!

पतीच्या शारीरिक आणि मानसिक जाचाला कंटाळून पनवेल येथील २५ वर्षीय विवाहितेची आत्महत्या, सोलापूरमध्ये पत्नीसह मुलाची हत्या करून शिक्षकाने स्वतः केली आत्महत्या, नागपूरमध्ये प्रशासकीय अधिकारी असलेल्या २५ वर्षीय तरुणाची आत्महत्या, सावकाराच्या जाचाला कंटाळून पुण्यातील एका रिक्षाचालकाची आत्महत्या, छेडछाड आणि बदनामीच्या धमकीला कंटाळून पुण्यातील एका अल्पवयीन मुलीने केली आत्महत्या,अग्नीवर म्हणून प्रशिक्षण घेणाऱ्या केरळमधील तरुणीची मुंबईत गळफास घेऊन आत्महत्या, या केवळ मागील २ दिवसांतील वृत्तपत्रातील बातम्या आहेत. या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई यांनी वयाच्या ५८ व्या वर्षी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. अनेक हिट चित्रपटांचे आणि मालिकांचे कला दिग्दर्शन करणारे देसाई यांच्यावर झालेल्या कर्जामुळे त्यांच्या स्टुडिओवर जप्ती आली होती. ती सहन न झाल्याने त्यांनी आपले आयुष्य संपवले. अभिनेता सुशांतसिंग राजपूत याने केलेल्या आत्महत्येमुळे सारे बॉलिवूडविश्व हादरले होते. त्यानंतर आणि त्याआधीही चित्रपट क्षेत्रातील अनेक निर्माता, दिग्दर्शक, अभिनेते आणि अभिनेत्रींनी वेगवेगळ्या कारणांमुळे आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली आहे. आजमितीला असे एकही क्षेत्र नाही जिथे आत्महत्या होत नाहीत. अध्यात्मशास्त्रानुसार ८४ लक्ष योनींचा फेरा पूर्ण झाल्यानंतर मनुष्यजन्म मिळतो. असा अनमोल जन्म सहजपणे संपवणे योग्य आहे का ?

एका सर्वेक्षणानुसार देशातील १३ टक्के तरुण कोणत्या ना कोणत्या तणावामुळे ग्रस्त असतात. जगभरातील तरुणांच्या आत्महत्यांपैकी १० टक्के आत्महत्या केवळ भारतात होतात. हा आकडा दोन लाखांच्या घरात असतो, त्यातील एक लाख हे १५ ते ३५ वयोगटांतील असतात, नॅशनल क्राईम ब्युरोच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत आत्महत्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या, प्रेमात अपयश आल्याने तरुणांची आत्महत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त झाल्याने रुग्णाची आत्महत्या, नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळाल्याने नोकरदारांची आत्महत्या, व्यवसायात कर्जबाजारी झाल्यामुळे व्यावसायिकाची आत्महत्या, कामाचा ताण सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांची आत्महत्या, यांसारख्या घटनांचे सध्या पीक आले आहे. आलेल्या संकटाचा सामना करण्याची उमेदच संपून गेल्यामुळे मनुष्य आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. ऐन उमेदीच्या काळात आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेण्यामागे अनेक भौतिक आणि मानसिक करणे असू शकतात. मात्र आज हा टोकाचा निर्णय घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यामागे कुठेतरी आपणच कारणीभूत आहोत याचाही विचार आत्महत्या करणाऱ्याने करायला नको का ?

परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही किंवा परीक्षेत कॉपी करताना पकडले यांसारख्या क्षुल्लक कारणांमुळे विद्यार्थी आत्महत्या करतात. पालकांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, आपल्यामुळे आपल्या पालकांना खाली मान घालावी लागेल या विचाराने विद्यार्थी आपली जीवनयात्रा संपवतात; मात्र आपल्या अशा जाण्याने पालकांना आयुष्यभराचे दुःख आपण देऊन जात आहोत याचा विचार हे विद्यार्थी केव्हा करणार ? मुलांच्या भविष्यासाठी त्यांनी सुंदर सुंदर स्वप्न पाहिलेली असतात, क्षणात या साऱ्या स्वप्नांचा चुराडा होतो. प्रेमात अपयश आल्याने ऐन तारुण्यात तरुण तरुणी आत्महत्येचा निर्णय घेतात; मात्र हे करताना त्यांच्या आई वडिलांनी त्यांच्यासाठी आजतागायत किती काय केले आहे याचा विचार ते केव्हा करणार. अपेक्षित जोडीदार मिळणे हेच जीवनाचे ध्येय असते का ? आपल्याला लहानाचे मोठे करण्यात आपल्या पालकांनी घेतलेले परिश्रम, त्यांनी आपल्याला लावलेली निरपेक्ष माया अशी क्षणात संपवून टाकायची असते का ? नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळते, इतरांची प्रगती होते मात्र आपल्याला डावलले जाते, वरिष्ठ अधिकारी आपल्याला घालून पाडून बोलतात, आपल्यावर कामाचा ताण टाकतात ही कारणे जीवनयात्रा संपवण्यासाठी कारणीभूत कशी काय असू शकतात. प्रयत्न केल्यावर, इतरांची मदत घेतल्यावर या सर्वांवर उपाय खरंच सापडणार नाहीत का ? शेवटी प्रत्येकाचे नशीब हे वेगवेगळेच असते. व्यवसायात कर्जबाजारी झाल्याने काही जण टोकाचा निर्णय घेतात; मात्र आपल्या आत्महत्या करण्यामुळे कर्जाची परतफेड होणार आहे का ? आत्महत्या केल्याने तुमची मुक्तता होईल मात्र तुमच्या घरच्यांनी काय अपराध केला आहे ? काहीजण याही पुढे जाऊन आपल्या मागे घरच्यांना त्रास नको म्हणून मुला बाळांना संपवून स्वतः आत्महत्या करतात. ज्या निष्पाप जीवांचे या सुंदर दुनियेत नुकतेच आगमन झाले आहे त्यांना संपवण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला ? त्यांना मारताना आपल्या काळजाला भेगा कशा पडत नाहीत ?आपल्या कृत्यात त्या निष्पापांचा अपराध तो काय ? दुर्धर आजाराने कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांनी हे भोग आपल्याच पदरी का पडले आहेत, आपली कर्मे या सर्वाला कारणीभूत आहेत का ? दुर्धर आजाराने ग्रस्त सर्वच जण आत्महत्या करतात का, हा विचार कधी केला आहे का ? कोणत्याही संकटावर आत्महत्या हा उपाय असूच शकत नाही. घरातील एकाच्या आत्महत्येमुळे सारे कुटुंब विस्कळीत होते. आत्महत्या तेच करतात ज्यांचे मन कमकुवत आहे. आत्महत्या हे मानसिक आजाराचे टोकाचे लक्षण आहे. आजमितीला भारतात ज्या प्रमाणात शारिरीक आजाराविषयी जागरूकता आहे त्या तुलनेत कितीतरी पटीने मानसिक आजाराविषयी गैरसमज आहेत. प्रत्येकाला जसा शारीरिक आजार होऊ शकतो तसा जीवनातील प्रसंगानुरूप मानसिक आजारही उद्भवू शकतो, त्यासाठी वेळीच मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे असते; मात्र 'मानसोपचार तज्ज्ञाकडे केवळ वेडेच जातात आणि आपल्याला काही वेड लागलेले नाही' असा फार मोठा गैरसमज भारतीयांत पसरला आहे, परिणामी सौम्य स्वरूपात असलेला मानसिक आजार कालांतराने उग्र स्वरूप धारण करतो. आणि त्यातूनच पुढे आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जाऊ शकतात.



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

आत्महत्या करणाऱ्यांच्याप्रति समाज सहानुभूती दाखवत असला तरी भारतीय संविधानानुसार तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. आत्महत्या केली म्हणजे सुटका होईल या विचाराने आत्महत्या करणारा हे धाडस करतो, मात्र ही खऱ्या अर्थाने सुटका नसतेच असे अध्यात्म सांगते. अध्यात्मानुसार मानवासह प्रत्येक प्राणीमात्राच्या जन्म हा प्रारब्धभोग भोगून संपवण्यासाठी झालेला असतो. त्यामुळे जन्म आणि मृत्यू हे विधिलिखित असते. त्यामध्ये ढवळाढवळ करून स्वतःहून मृत्यू ओढवून घेतल्यास पृथ्वी लोकातील समस्यांपासून सुटका मिळेल; मात्र विधात्याच्या नियोजनात हस्तक्षेप केल्यामुळे आत्महत्या करणाऱ्याचा आत्मा पुढील अनेक वर्षे भुवलोकात हालअपेष्टा सहन करत तडफडत असतो. त्या सहन करून संपवल्याशिवाय त्याला पुढच्या योनीमध्ये जन्म मिळत नाही. ८४ लक्ष योनीचा फेरा पूर्ण केल्यानंतर मिळणाऱ्या मनुष्य जन्माचे सार्थक करणे विधात्याला अपेक्षित असते; मात्र स्वतःच्या कर्मदरिद्रीपणाने आत्महत्येसारखी पळवाट स्वीकारणाऱ्याची मृत्यूनंतरही सुटका नसते. त्यामुळे आत्महत्या करून सूटका होते हा केवळ गैरसमज आहे.

# पुस्तकं वाचायला हवी...

परवा शालेय शिक्षण विभागाने शालेय शिक्षण स्तरावर सहभागी असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या वेळपत्रकात आठवडयातून दोन तासिका वाचनासाठी राखून ठेवण्यात आल्याचा शासन निर्णय जारी केला.या तासिकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्काराची रूजवण होऊन त्यांना जीवन उन्नतीची दिशा मिळेल अशी अपेक्षा आहे.गेले काही वर्षात आपल्याकडील वाचन संस्कार कमी होता आहेत अशी ओरड आहे.तेरा कोटी लोकसंख्येच्या असलेल्या राज्यात एक हजार पुस्तकांच्या प्रति विकल्या जाण्यासाठी मोठया कालावधीची प्रतिक्षा करावी लागते.हे एकीकडचे वास्तव.मुळात वाचन करणारी पिढी आता हरवत चालली आहे का? कधी काळी ग्रंथालयात पुस्तक वाचनारी,पुस्तके देवाणघेवाण करणारी माणसांची रेलचेल दिसायची. आता ग्रंथालयांमधील गर्दी हरवत चालली आहे.ग्रंथालय ओस पडता आहेत..शाळांमधील ग्रंथाचे पालन करणारे पालक म्हणजे ग्रंथपाल ही पदे आत लुप्त होत चालली आहे..पुस्तक वाचनारी आदर्श भोवतालमध्ये दिसत नाही.घराघरात वाचनारी माणसंही हरवत चालली आहे..ज्ञानाची उंची असणारी माणसांची संख्या आटत चालली आहे..त्यामुळे नव्या पिढीला वाचनारी माणसं दिसत नाही मग...नवी पिढी देखील मोठयांचीच वाट चालणे पसंत करतात.

पुस्तके वाचणारी माणसं शाळा,महाविद्यालयात किमान सतत दिसायची.शिक्षकांचे मस्तकाचे अन्न म्हणजे पुस्तके होती..आज शाळा महाविद्यालयांना ग्रंथायलाची गरज वाटू नये अशी स्थिती आहे.पुस्तके वाचली जाणारी पिढी घडली गेली तर मूल्यांच्या पेरणीसाठी स्वतंत्र प्रयत्न करण्याची गरजच पडणार नाही.पुस्तके माणसांची मस्तके घडवितात.त्या पुस्तकातून विचाराचे ऐश्वर्य मिळत जाते.पुस्तकं वाचना-या माणसांना ज्ञानाची भूक लागते..मग पैशाची आणि संपत्तीची भूक आपोआप कमी होत जाते.ज्ञानाची भूक लागलेली माणसं प्रशासनात आली तर ती अधिक निर्मळतेने काम करतात.त्यांना भ्रष्टाचार करावा वाटत नाही.पैसा ही त्यांच्यासाठी संपत्ती राहत नाही.पुस्तके माणसांच्या मस्तकी विवेकाची पेरणी करत जातात. त्यामुळे शहाणपणाची वाट चालत रहाणे घडत जाते.आज समाजात दिसणारे संघर्ष वाढता आहे..लोक अधिक हिंसक बनता आहेत.माणसांमाणसांमधील भेद वाढता आहेत.माणूसपणा ऐवजी जात,धर्म केंद्रस्थानी येतो आहे.माणसं सत्व हरवत चालली आहे.आपल्यातील माणूसपण आटत चालले आहे.आत्मपरिक्षणाची वाटही हरवत चालली आहे.त्यामुळे आपण कितीही खोटे वागलो तरी त्याचे काहीच वाटत नाही.चांगले वाईट याचा विचारही मनात घर करत नाही.त्यामुळे आपला प्रवास पुन्हा 'मानव' च्या दिशेने होतो आहे का ? पुस्तकांशी सोबत करणारा प्रत्येक जन मानव ते माणूस अशा दिशेचे प्रवास करत असतो..आज ते घडत नाही..आज आपले वाचन समाजमाध्यमांच्या पुढे जात नाही.त्यातून आपण बरच काही गमावतो आहोत.त्यामुळे कधीकाळी येथील राजकारणातील माणसं देखील देशातील जनतेसाठी वंदनीय होते..यशवंतराव चव्हाणांसारखी माणसं सतत पुस्तकाच्या सोबतीने



जगत होती..आपल्या राज्यातील साहित्यिकांसाठी ते सतत प्रेरक होते. त्यांच्या सन्मासासाठी हात पुढे करत होते.यशवंतराव जीवनभर येथील मातीशी आणि माणसांशी प्रामाणिक राहिले हे पुस्तकांनी दाखवलेल्या जीवनमार्गाचे फलित तर नाही ना..!

मुळात वाचायचे कशासाठी तर आनंदासाठी.वाचन म्हणजे आनंदाची उधळन,रोज नव्या वाटांचा प्रवास आहे.. जीवनभर ज्ञानाची उपासना आहे.एकदा आपण पुस्तकांच्या दुनियेत गेलो की जीवनाचा नवा अर्थ उलगडत जातो..मनाची मशागत होते..वाचनाने मस्तकाला सामर्थ प्राप्त होते आणि हदयाला संवेदनशीलता लाभते..आज आपल्या नात्यातील वीण हरवत चालली आहे..ओलावा आटत चालला आहे अशावेळी पुस्तके निश्चित आपल्याला मदत करतील.आज आकाश फाटलेले दिसते आहे..अशावेळी आपल्याला काही सांधे घालायचेच असतील तर आपणच.पुस्तकांशी मैत्री करायला हवी.पुस्तकांशी बोलायला हवे.पुस्तके मग मनातील गुज सांगत राहतील...आणि आपणही बहरत जाऊ.म्हणून लहान वयापासूनच पुस्तकांशी नाते सांगूया. पुस्तकांशी मैत्री करूया...पाहूया हे सारे जमते का ? जीवन बदलाची वाट सापडते का ?

## शब्दकोडे-२४८



**आडवे शब्द**

१. दृढ, पक्का ३. देखणा ६. मृत्युसमय ९. पाऊल (हिंदी) १२. चांदी १४. सरिता १५. विटीसाठी खणलेला खड्डा १६. पुख्खा झोडणे १८. हनुमानाच्या या नावात एक पांडवही आहे १९. गंध २०. अंत:करण २२. बोच २३. शृंगार (हिंदी) २६. संगीतातील एक राग २८. इंग्रजांच्या काळची एक पदवी ३०. गणपती ३१. खिडकी ३२. जमिनीवरील कर ३३. चिक्कू, कंजूष ३४. रात्र ३५. महिना ३८. कमळ ३९. सावध ४०. अप्पलपोटा ४२. कणिक भिजण्याचे पात्र ४४. निरोगी ४५. याला अक्कल नसते अशी म्हण आहे ४७. लाकूड ४८. आणि ४९. दमट, ओलसर ५१. पराभव, हार ५२. पशूतुल्य मनुष्य ५३. मत्सर, द्वेष ५५. मस्ती ५७. लोणच्यासाठी चिनीमातीची चांगली! ५८. चांदी ६०. उसाचा रस काढण्याचे यंत्र ६२. रात्र ६४. पापणी (हिंदी) ६५. मदत करणारे ६७. स्त्री ६८. भक्त प्रल्हादाची आई ६९. तारणारे ७१. प्रमाणपत्र, दाखला ७३. ब्राह्मण ७५. मराठी मुळाक्षरातील पहिले ७६. हात ७७. उटण्यातील सुवासिक वनस्पती ७९. विशाल, उत्कृष्ट ८०. एक प्रकारचा क्षार ८१. सैनिकांना केला जाणारा मालपुरवठा ८२. सारखे

**उभे शब्द**

१. अगदीच ऐकू न येणारा २. टप्पा ४. लोक ५. भांगात घालायचा एक दागिना ६. शरीर ७. मऊ ८. वेल ९. जास्तीत जास्त १०. भाव, किंमत ११. सापाची विषारी जात १३. तेव्हा (हिंदी) १७. उधार १९. दिवस २१. डोळे २३. कुंकू (हिंदी) २४. थंड, शीत २५. अबोध २७. देवाचे द्वारपाल २९. वस्ती २९अ. ठीक ३०. न बोलता, मुकाट्याने ३४. राजाविषयी निष्ठा असणारा ३५. गावचा कारभारी अधिकारी ३६. शिवरायांच्या अष्टप्रधानांपैकी एक ३७. दयाळू ३८. आदरार्थी संबोधन ३९. प्रसंगावधान ४१. जवळीक ४३. रात्री सुगंध पसरवणाऱ्या फुलांचे झुडूप ४६. खर्चाच्या उलट ४७. आसामचे जुने नाव ५०. एक उभयचर प्राणी ५२. जीवघेण्या वेदना ५४. मित्र (हिंदी) ५६. डोळ्यातील बाहुली (सं.) ५७. अंड्याच्या आतील भाग ५९. कंबर ६१. सोने ६३. तीव्र रेचक ६६. चंद्रोदयाबरोबर उमलणारे कमळ ७०. विष्णू ७२. परका, अपरिचित ७३. मनोभंग ७४. आनंद (सं.) ७६. पदार्थाचा लहान अंश ७८. मगज ७९. नकलून काढलेला मजकूर

## शब्दकोडे-२४७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.कडेकोट ४.वारेमाप ७.नतमस्तक ११.करडई १३.गरम १५.वास १६.चरा १८.वरण २०.हाटक २२.खनन २४.राम २५.टच २६.माळी २७.लगड २९.वसंत ३१.नायक ३२.माकड ३४.हराम ३५.बाका ३६.डर ३८.नावडतीचे मीठ ४०.बारका ४२.सकटनिकट ४६.नायनाट ४७.जनकजननी ५०.कमळ ५२.नगर ५३.पत्रास ५५.टक ५६.कमालकिमान ६०.उमर ६१.रविवार ६२.अट ६४.सरकार ६६.आदानप्रदान ६८.चाकवत ७०.खारट ७१.समवेत ७३.खडा ७४.रामरक्षा ७७.लांडगा आला रे आला ८१.काजळ ८२.कपटी ८३.वर ८४.शीतल ८५.कानन

**उभे उत्तर**

१.कडवट २.कोकण ३.टर ४.वाईट ५.माग ६.परखड ८.तवा ९.मसलत १०.कचरा १२.डहाळी १४.मन १७.रामराम १९.रचनाकर २१.कलकलाट २३.नव २६.माकड २८.गड ३०.संमती ३३.सावट ३४.हमी ३४अ.राठ ३५.बाबागाडी ३७.रसना ३८.नाक ३९.चेतक ४१.कानामात्राउकार वेलांटी ४३.कटकट ४४.निखळ ४५.पनीर ४७.जहाल ४८.जनन ४९.नग ५१.मकर ५४.समर ५६.कवायत ५७.मार ५८.किल्लेदार ५९.खसखस ६२.अदाकार ६३.टन ६५.पोचा ६६.आखाडा ६७.नटराज ६९.कमला ७२.तड ७३.खलाशी ७५.मळका ७६.क्षालन ७८.गाव ७९.आर ८०.रेघ ८१.काल

## सोभाव (सुत्र २६)

### मानूसना जगाना खरा हेतू



डॉ.रा.प्र.पारनेरकर

मानूसनी फक्त खावाकरता जगतो नै.चांगल जगा करता खावाले जोयजे,आस म्हनतस.पन वस्तू स्थितीना जर ईचार करा ते काही न्यारच सामने दिखाई देस. तसं देखाले गये ते समदाच जेवन करतस आनी जीवन जगतस.पन खरोखरनं जगासाठे जेवनारा कितला शेतस? या प्रश्र्नन उत्तरं थोडा फारच असं शे. तव्हय बाकी समदा खावासाठी जगतस.असं मांडन पडी.असा ईचार करा ते यान्हामाहीन मानुस काही शिकना नै असंच दिखाई देस. परंतु हाऊ जो सिद्धांत त्यानी आपला जीवनम्हा चांगला उपेग करताना दिखाई देस नै. जीवन कलहच खूप मोठा व्हत जास. त्याले जीवनन सोस्थ भेटत नै.हाईच खरं. परंतु उगीच कामना आव आनस.मानूस आपला जेवननी आपनच फजिती करी लेतस.याले काही देशनी आर्थिक परिस्थिती त्यानी सोतानी आर्थिक परिस्थिती नै ते त्यानावर कामना मोठा बोजा ह्या असा कारनं नैत.जे कामले महत्व शे ते जेवाले नै,हाई दाखाडासाठे आजना मानूस बाई मानूस जेवाले महत्व देत नै.म्हनजेच ते एक काम समंजस.जेवानं उरकावस.पन म्हनीसन आजना मानूस कामले महत्व देस असं म्हनान का? उदाहरन म्हनीसन जर मानूस खरोखरच कामले महत्व देत –हाता ते आपल्या देशन्या सरकारी आनी खाजगी कामनी से ती परिस्थिती अशी –हती का ? आज हरेकना घरमा आनी देशमा कामले महत्व देतो, काम हाई पवित्र गोट समजथस,कामना कधीच कटाया करता नैत अशा कितला आनी कोन कोन शेतस ? याना ईचार करा ते नक्की शोध लागीन यांना सारं असा निंघस की, मानून ले एखाद जे तत्व जे उदात्तपने (शिकाले) शिकाडंन ते तो उदास हेतू ठिसनी शिकत नै. शिकाडेल जे –हास ते तो शिकस हाउस खरं. पन तो जे शिकस ते अनुदार हेतू माहीनच. या वरना अशा उदात्त सिद्धांतना उपेग मानूसनी आपला आयस आनी गबालेपनना वाढानासाठी करा. तो या गोष्टीसपाशीन दुसरं चांगले ते काय शिकना? या वचनपआसून मानूस जे जोयजे तेच शिकता ते त्यानी घरनी जेवनानी स्थिती आनी जइभनआ करेल लाड चांगलं जबून खावासाठे ज्या हॉटली आज दिखतीस शेतीस तशा त्या दिखत्यात का ? आपून मानूसले बुद्धीवान प्रानी जनावर समजतस पन या परमाने तो आपला अक्कल ना उपेग करत –हाता. त्याले अक्कल शे म्हनीसन त्याले अक्कलवान समजो का ? यावरथून मानूसना सोभाव कोनता परकारना शे हाई दिशी येस. याले अपवाद कितला? मंग मानूस हाऊ मूल चांगली प्रवृत्ती ना का –हास ? जर तो खरोखर जन्मत: चांगली प्रकृतीना –हाता ते मानूसना सोभाव अशा व्हवाना काय कारने शेतस?

**– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**न्यूज कॉलम**

### लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचाची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**नाशिक ।** लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचची सर्वसाधारण सभा (२६ नोव्हेंबर) रोजी सारडा कन्या विद्यालयात मंचचे अध्यक्ष रंजनभाई शाह यांच्या अध्यक्षतेखाली सभासदांच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी संघाच्या उपक्रमाविषयी मंचचे सचिव रमेश डहाळे यांनी माहिती दिली तर कोषाध्यक्ष जितेंद्र येवले यांनी मंचाच्या वर्षभरातील जमाखर्चाचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला. यावेळी उपस्थितांनी लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचतर्फे प्रत्येक वर्षाचा चढता आलेख पाहून समाधान व्यक्त केले व वर्षभरात ज्येष्ठांसाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार केला. याप्रसंगी सभासदांनी विविध मुद्यांवर आपले मते मांडली.

### नाशिक परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत शहर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

**नाशिक ।** जळगाव येथे पार पडलेल्या ३४व्या नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी बजावत पदकांची कमाई केली आहे. या स्पर्धेमध्ये आयुक्तालयाचे १४० पुरुष व ४० महिला पोलीस खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

# अवकाळी पावसाने नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ पंचनामे करून भरभक्कम भरपाई द्या

**छावा क्रांतीवीर सेनेचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन**

### पिक विमा कंपन्यांचे निकष बदलून शेतकऱ्यांना न्याय द्या

**नाशिक । प्रतिनिधी**



> बी बियाणे, औषधे, मजूर यांवर भरमसाठ खर्च करून तयार झालेली पिके पूर्णतः नष्ट झाल्यामुळे शेतकरी मानसिक व आर्थिक दृष्ट्या कमजोर झाला आहे. अशा मोठ्या संकटांचा सामना करावा लागत असून प्रत्येक शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे तर एकूण जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे शेकडो कोटींचे नुकसान झाले आहे. मालातील दर घसरणीमुळे आधीच बळीराजा मेटाकुटीला आलेला असताना आता या अस्मानी संकटांनीही बळीराजाच्या तोंडचा घास हिसकावण्याचे काम केले आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी बांधवाला धीर देणे ही राज्य सरकार व केंद्र सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे.
>
> **- करण गायकर, संस्थापक अध्यक्ष, छावा क्रांतिवीर सेना महाराष्ट्र राज्य**

अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे जलद गतीने पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई मिळावी या आशयाचे निवेदन छावा क्रांतीवीर सेनेच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविण्यात आले आहे.

छावा क्रांतीवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या नेतृत्वाखाली छावा क्रांतिवीर सेनेच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांना दिलेल्या या निवेदनात म्हंटले आहे की, मागील दोन दिवसात नाशिक जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागात अवकाळी पाऊस झाल्याने उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. आधीच हलाखीत असलेला शेतकरी पूर्णतः उध्वस्त झाला आहे. एका बाजूला शेती फुलावी यासाठी देवाची आराधना करणाऱ्या बळीराजाला हाता तोंडाशी आलेला घास अवकाळी व गारांच्या पावसामुळे तयार झालेले भात, द्राक्ष, गहू ,कांदा, हरभरा, टोमॅटो, उस या सर्वच पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतात उभी असलेली पिकं अक्षरशः झोपली आहेत. पुढील तीन दिवसांपर्यंत अशाच प्रकारे पाऊस पडत राहण्याची शक्यता वर्तवली जात असल्यामुळे शेतकरी बांधवांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. जोरदार वारा आणि तुफानी गारांचा पाऊस यामुळे अनेक ठिकाणी कापणीला आलेली पिके आडवे पडल्याचे दिसून येत आहे. हजारो शेतकऱ्यांचे तयार झालेले द्राक्षाचे भात तसेच कांदा पीक देखील संकटात सापडले असून बागायतदारांची वर्षभराची मेहनत एका तडाख्यात नष्ट झाली आहे. पुढील दोन वर्ष बळीराजा उभा राहणार नाही इतके नुकसान शेतीचे झालेले आहे. त्यामुळे माय बाप सरकारने या शेतकऱ्यांना सहानुभूती दाखवून भरभक्कम नुकसान भरपाई देणे अत्यावश्यक आहे.

त्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा प्रशासनाने अशा अवकाळी पावसाने नुकसान केलेल्या क्षेत्राचे तातडीने पंचनामे करणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषिमंत्र्यांनी एकूण परिस्थिती लक्षात घेऊन तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश तातडीने द्यावेत ही विनंती. अन्यथा शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी छावा क्रांतिवीर सेना संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडेल आणि या संतप्त शेतकऱ्यांच्या संतापातून होणाऱ्या परिणामांची जबाबदारी ही सरकारवर राहील. असा इशारा या निवेदनात शेवटी देण्यात आला आहे.

यावेळी निवेदन देण्यासाठी संस्थापक अध्यक्ष करण गायकर, युवा प्रदेशाध्यक्ष शिवा तेलंग, जिल्हाध्यक्ष आशिष हिरे, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष मनोरमा पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सुभाष गायकर, महिला आघाडी उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष संगीता सूर्यवंशी, दिनेश नरवडे, ज्ञानेश्वर कोतकर, सागर जाधव,भारत पिंगळे, वैभव दळवी, किरण लवंड, रेखा पाटील, पूजा तेलंग, शालिनी काळे, रूपाली काकडे, सविता वाघ, प्रशांत सूर्यवंशी, रूपाली लोखंडे, भाऊसाहेब धोंडगे, साधना गांगुर्डे, आरती खंडीजोड, अमोल देवरे आदींचा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुलसी सर्वांसाठीच आरोग्यदायी : कृष्णा महाराज कमानकर

### स्वामीनारायण नगर येथे तुलसी विवाह सोहळा

**नाशिक । प्रतिनिधी**



भगवान दत्तात्रेयांची आई अनसुया माता यांनी पतिव्रतेच्या बळावर ब्रम्हा, विष्णू, महेश यांना लहान -लहान बालके करुन स्तनपान केले होते. त्यामुळे पतीव्रता स्त्री देवावरही सत्ता गाजवते. त्यामुळे तुलसी पतीव्रता स्त्रीसाठी आदर्श आहे, तुलसी पूजन पुण्य दायी असल्याचे विचार युवा कीर्तनकार 'मन मंदिरा गजर भक्तीचा' फेम कृष्णा महाराज कमानकर यांनी येथे मांडले.

पंचवटीतील स्वामीनारायण नगर येथे तुलसी विवाहाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात कृष्णा महाराज बोलत होते. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे, श्री पंचमुखी हनुमान मंदिराचे महंत भक्तिचरणदास महाराज, त्र्यंबकेश्र्वर येथील श्री कंठानंद महाराज,

प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेच्या ब्रह्मकुमारी पुष्पा दीदी, किर्तनकार फौजी महाराज सुर्यवंशी ,आ.राहुल ढिकले, माजी सभागृह नेते कमलेश बोडके, माजी नगरसेवक सुरेश खेताडे, विशाल पवार, आयोजक सोमनाथ बोडके, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

महाराज म्हणाले की, तुळस ही अगोदरच्या जन्मात वृंदा होती. भगवान विष्णुशी विवाह करायचा, अशी तिची इच्छा होती. तसे प्रयत्न देखील तिने केले पण यश आले नाही. कारण तिचे पुण्य कमी पडले. काही कारणास्तव तिला जालंदर राक्षसासी विवाह करावा लागला. पण जालंदराच्या मनात कपट होते की, वृंदा ही पतिव्रता आहे. आपण हिच्या बळावर देवांवर सत्ता गाजवू म्हणून तो देवावर चाल करुन गेला. पण धर्मासाठी भगवान विष्णूने वृंदेचे पातीव्रत्य नष्ट करुन जालंदराचा वध केला. आपला पती गेल्यामुळे वृंदा सती गेली. तेव्हा दोघांची राख एकत्र झाली. काही दिवसाने त्यातूनच एक रोपटे बाहेर आले, तिचेच नाव तुळस असल्याचे ते म्हणाले. डॉ मारुती आणि तृप्ती घुगे यांच्या हस्ते तुळसी मातेचे पूजन करण्यात आले. आयोजक युवक मित्रमंडळाचे अध्यक्ष सोमनाथ बोडके, शाहीर बाळासाहेब भवर , गिरीश आहेर, ,अमित घुगे, शाम पिपरकर, चंद्रशेखर पंचक्षरी, दिगबर धुमाळ, धनंजय पुजारी महेश मंहकाळे,अनिल डोळसे, रमेश काशियानी, जयेश टांक, योगेश पाटणकर, सागर भगत, सचिन शिरुडे, , महेश कापडे, भावेश भगत, जितेंद्र महाजन, विशाल पवार,जयेश काठे आदींसह भाविक उपस्थित होते.

धर्म व्याख्यानाचा विषय नाही .व्यावसायिक रूप होत आहे. ऋषी मुनींची दृष्टी व्यापक होती. स्वाधीन तेची उपासना म्हणजे धर्म. देह, देव आणि देशासाठी सर्वांनी जागरूक राहावे. धर्माने चिकित्सक पद्धतीने बघावे. धर्म मान्यतेच्या विषय नाही. व्यापकता हिंदू धर्माचे सार आहे. हिंदू धर्माचे तत्व सार्वभौम आहे. असे सांगितले कंठानंद महाराज , त्र्यंबकेश्र्वर सांगितले. पंचवटीतील स्वामी नारायण नगर येथील सार्वजनिक तुळसी विवाह सोहळ्याप्रसंगी युवा कीर्तनकार कृष्णा महाराज कमानकर. समवेत डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे, महाराज, ब्रह्मा कुमारी पुष्पा दीदी, आ. ढिकले, आयोजक सोमनाथ बोडके, फौजी महाराज सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

## पावसामुळे उन्मळून पडलेल्या आंब्याच्या वृक्षाला हरितसेनेच्या माध्यमातून जीवनदान

**नाशिक । वार्ताहर**

लासलगाव येथील नटवर डागा यांच्या घराच्या मागे असलेल्या आंब्याचे झाड रविवारी झालेल्या पावसामुळे उन्मळून पडले होते. संध्या डागा यांनी तत्काळ दखल घेत हरित सेनेचे संजय बिरार यांना संपर्क करून या बाबत माहीती दिली.हरित सेनेने लागलीच दखल घेऊन त्या झाडाचे व्यवस्थित स्थलांतर करून ज्ञानेश्र्वर माऊली मंदिरात त्याचे प्रत्यारोपण केले.

हरित सेनेच्या माध्यमातून आंब्याच्या वृक्षाला जीवनदान मिळाले.नुसती झाडे न लावता त्यांची निगराणी करत त्याचे योग्य संगोपन करण्याचे काम हरितसेना लासलगाव येथे करत आहे.उन्मळून पडलेल्या वृक्षाला ज्ञानेश्र्वर माउलींच्या मंदिर सानिध्यात जगण्यासाठी बहरण्यासाठी पुनर्जीवन मिळाले. सगळ्यांनाच ठाम विश्र्वास आहे हे झाडाला उत्तम फुलांचा मोहर व फळे लागतील कारण त्याला माऊलिंचा आशीर्वाद निस्वार्थी ममता पूर्ण हरित सेनेचे संगोपन मिळत आहे. यासाठी नटवर डागा,संध्या डागा,संजय बिरार,राजेंद्र होळकर,डॉ.रूपेश गांगुर्डे, शेखर शिंदे,प्रशांत मोरे, ऋषीकेश जोशी,दिनेश जोशी,निलेश जगताप,शेखर कुलकर्णी,सुशील जोशी,प्रकाश मांजरे यांचे सहकार्य लाभले.

### संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन

**शिरपूर ।** भोरखेडा येथील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. प्राचार्य आर. एफ शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमात पर्यवेक्षक सी. जी. पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी एन. डी. चव्हाण, डी. आर. राजपूत, आर. जी. पाटील, मीना पटेल, दिपाली निकम, एस. एम. पाटील, एस. आर. देसले, व्ही. एस. ईशी, पी. टी. चौधरी, व्ही. डी. पाटील, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## एड्स दिनानिमित्त विद्यावर्धिनी महाविद्यालयात मानवी साखळी

**धुळे । प्रतिनिधी**



जागतिक एड्स दिनानिमित्त विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे येथे आज कार्यक्रम झाला. शपथ विधी व मानवी साखळी तयार करून स्वयंसेवकांनी एड्स व संसर्ग रोगांविषयी जनजागृती केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर वानखेडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे सल्लागार प्रा. डॉ. प्रशांत लगडे, कार्यालयीन कर्मचारी राहुल वाघ उपस्थित होते. विशेष म्हणजे महाविद्यालयात विविध शाखा आणि वर्गांच्या परिक्षा सुरू असतांना दोन सत्रांच्या मध्ये स्वयंसेवकांनी एकत्र येऊन रेड रिबीनची मानवी साखळी तयार केली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष खत्री यांनी जागतिक एड्स दिना विषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर एड्स जनजागृती विषयी शपथ देण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ. बाजीराव पाटील, सहाय्यक महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मंजू तरडेजा यांनी परिश्रम घेतले.


प्रोसेस पेड — ॲड. एम. जी. महाजन

नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज. नं. १३७५/२०२३**

१. श्री मनोज भीमा उदिकर,
रा.चितोड वरचे गांव, आश्रमशाळे समोर, रावेर रोड, चितोड, ता. जि. धुळे.
ह.मु. घुगे चाळ, इदगाह जवळ, मनमाड, ता. नांदगांव, जि. नाशिक,
२. बेबिबाई श्रीराम पंगुडवाले
रा.मु.बाभुळवाडी, पो. साकोरा, ता.नांदगांव, जि. नाशिक,
३. कल्पना संजय गवळी रा.मोगलाई, गवळीवाडा, धुळे
४. सोनी दीपक गवळी
रा.फुले चौक, मनमाड, ता.नांदगांव, जि.नाशिक. **... अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** **.... सा. वाला**

कै. भीमा मुकुंदा उदिकर **...मयत**

कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी (Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदारयांनी मयत भीमा मुकुंदा उदिकर यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. ७ यांचे कोर्टात दिनांक १८/०१/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत / प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत भीमा मुकुंदा उदिकर यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate ) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. ३०/११/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर धुळे** **दिवाणी न्यायालय क.स्तर धुळे**


## कलागुणांना वाव मिळण्यासाठी स्पर्धांची गरज: कुणाल दराडे

**नाशिक । वार्ताहर**



अनेक युवक,युवतींमध्ये विविध पैलू असतात,त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध प्रकारच्या स्पर्धा आज गरजेच्या आहेत यातून अनेक चांगले कलावंत उदयास येतात असे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुणाल दराडे यांनी केले.

लासलगाव येथे कुणाल दराडे फाउंडेशन च्या वतीने रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेचा निकाल नुकताच शहरातील हॉटेल लिबर्टी येथे संपन्न झाला यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख कुणाल दराडे ,कृषी तज्ञ सचिन होळकर,डॉ विलास कांगणे,डॉ संगीता सुरसे,भारती ब्रम्हेचा आशा पवार,नलिनी सोनवणे,जयश्री बोराडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

रांगोळी स्पर्धेत लासलगाव शहरातील एकूण ५६ स्पर्धकांनी भाग घेतला.या स्पर्धेचे परीक्षण लासलगाव शहरातील सामाजिक कार्यकर्त्या माया होळकर, चैताली होळकर,अनुष्का परदेशी यांनी केले.रांगोळी स्पर्धेच्या विजेत्यांमध्ये प्रथम क्रमांक वृषाली पवार, द्वितीय क्रमांक फाल्गुनी गांगुर्डे तर तृतीय क्रमांक श्रावणी देसाई व अवधूत वाघ यांना देण्यात आला. चौथा क्रमांक कविता चव्हाण यांनी पटकावला.१४ वर्षे वयोगटाखालील स्पर्धेत खुशी रंधे ने प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षीस व स्मृतिचिन्ह देण्यात आले.

## डॉ. ताडे यांना कर्करोगाबद्दल जनजागृती व संधोधन उपयोगी साधनांसाठी अनुदान

**शिरपूर ।** येथील एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयातील डॉ. राहुल ताडे यांना पुणे येथील बी. एस. कौन्सिल ऑफ एज्युकेशन आणि रिसर्च ह्या नामांकित संस्थेकडून त्यांच्या संशोधनावर आधारित माहिती शिरपूर तालुक्यात प्रसारित आणि कर्करोगाबद्दल जनजागृती करण्यासाठी २१ हजार रुपयांचे अनुदान प्राप्त झाले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी दिली.

सदर संस्था हि उच्च क्षमता असलेल्या परंतु मर्यादित आर्थिक संसाधने असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक आणि नैतिक समर्थन देण्यासाठी अस्तित्वात आणली गेली आहे. संस्थेचा ठाम विश्वास आहे की, कोणत्याही पात्र विद्यार्थ्याला त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षण घेण्याची संधी नाकारली जाऊ नये. बी. एस. कौन्सिल ऑफ एज्युकेशन आणि रिसर्च द्वारे मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

## तरुणींचा १०० गावांत बालविवाहविरोधी जागर

### कैलास सत्यार्थी फाउंडेशनचा उपक्रम, गावकऱ्यांना दिली शपथ

**नाशिक । प्रतिनिधी**



उत्तर महाराष्ट्रासह राज्यभरात बालविवाहाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनला असून कायद्यात कठोर तरतूदी करूनही बालविवाहाच्या घटना समोर येत आहेत. गेल्याच महिन्यात नाशिक जिल्ह्यात आठ प्रकरणे समोर आली आहेत. या पाश्र्वभूमीवर मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने शहरासह जिल्ह्यात बालविवाह मुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत १०० हून अधिक गावात विद्यार्थ्यांसह स्थानिक महिलांना सोबत घेऊन रॅली काढून बालविवाह निर्मूलनाबाबत जनजागृती करीत ग्रामस्थांना बालविवाहविरोधी शपथ देण्यात आली.

मविप्र समाजकार्य महाविद्यालयाने कैलास सत्यार्थी फाउंडेशनच्या मदतीने जिल्ह्यात विविध गावे तसेच वाडी-वस्त्यांमध्ये रॅली, व्याख्यने व चर्चासत्राचे आयोजन केले. या चर्चासत्र व व्याख्यानातून किशोरवयातील मुला-मुलींमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या आणि त्यावरचे उपाय तसेच लैंगिक हिंसाचारास बळी पडलेल्या पीडिता संदर्भात संस्था कायदेशीर मदत, मानसिक मदत आणि समुपदेशन यांसह बालविवाहामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तब्बल १०० गावांमध्ये भेटी देऊन तेथील महिला, मुलींची भेटी घेत त्यानां बालविवाह करण्यास प्रवृत्त करणाऱ्यांना आणि १८ वर्षांच्या वयाआतील मुलींच्या लग्नास सहभागी होणाऱ्या मंडळीविरोधात देखील फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. याची देखील माहिती देण्यात आली. राजू भारद्वाज यांनी 'बालविवाहमुक्त भारत' संकल्पना मांडत मार्गदर्शन केले. अभियान यशस्वितेसाठी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक डॉ. प्रतिभा पगार, प्रा. सुनिता जगताप, डॉ. मनीषा शुक्ला, गीतांजली पवार आदींनी विशेष परिश्रम घेतले.

### पाणीपट्टी दरवाढ, मलजल उपभोक्ता शुल्काला स्थगिती

**नाशिक ।** नाशिक महापालिकेने स्थायी समितीच्या सभेत घेतलेला पाणीपट्टी दरवाढीचा व मलजल उपभोक्ता शुल्क आकारणीचा निर्णय स्थगित करण्यात आला आहे. यामुळे पूर्वीप्रमाणेच नाशिककरांना पाणीपट्टी आकारली जाईल, नाशिककर जनतेची मागणी व त्यांच्या भावनांचा विचार करता हि दरवाढ रद्द करण्यात आली असल्याची माहिती मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अशोक करंजकर यांनी दिली आहे. या निर्णयाबाबत पालकमंत्री आणि मनपा आयुक्त यांच्यांत याबाबत चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. अशी माहिती मनपा अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.


प्रोसेस जमा — ॲड.सौ.अरूणा डी. महाजन

नि.६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज. नं. १३७७/२०२३**

१. श्रीमती रमोला भटू पाटील २. सौ. रत्नप्रभा भटू पाटील
३ सौ. मंगलप्रभा राजेंद्र पाटील ४. सौ. भारती जगदीश पाटील
५. सौ. किरण निखिल वाघ
६. श्री. निलेश भटू पाटील **... अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** **.... सा. वाला**

कै. भटू चैत्राम पाटील (मृत्यु दिनांक : ३०/१०/२०२३)
मृत्यु समयीचा पत्ता : रा. कापडणे, ता.जि. धुळे **...मयत**

कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी
(Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. भटू चैत्राम पाटील यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. १ यांचे कोर्टात दिनांक १४/०१/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत / प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. भटू चैत्राम पाटील यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि.३०/११/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर धुळे** **दिवाणी न्यायालय क.स्तर धुळे**

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करा : अशोक धात्रक

**साक्री । प्रतिनिधी**



जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या कंबरडे मोडले असून, अवकाळीने सर्वात जास्त नुकसान साक्री, पिंपळनेर या भागात झाले आहे. शेतकऱ्याच्या नुकसानग्रस्त शेतशिवारातील प्रत्येक पिकाचा पंचनामा तलाठी व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्यावतीने करून घेतला जाईल व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शिवसेना सातत्याने शासन दरबारी आवाज उठवेल तसेच पीक आणेवारी वसूल करताना पुढील रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांचा पिक विमा संबंधित तलाठ्यांनी आधीच उतरून घ्यावा, असे आवाहन शिवसेना संपर्कप्रमुख माजी आमदार अशोक धात्रक यांनी साक्री व पिंपळनेर तालुक्यातील अनेक ठिकाणी नुकसानग्रस्त गावातील शेतकऱ्यांना सोबत घेऊन शेतात झालेल्या पिकाच्या नुकसानाची पाहणी केली.

साक्री तालुक्यातील अनेक गावात अनेक ठिकाणी पंचनामे झालेले नव्हते तसेच काही ठिकाणी कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष करून पंचनामे करण्यास टाळाटाळ केली. असता प्रत्यक्ष तलाठी व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून अशोक धात्रक यांनी ते पंचनामे करून घेण्यास सांगितले. या भागात सर्वाधिक नुकसान हे कांदा पिकाचे झाले असून, शेतक-यांनी उन्हाळी कांद्यासाठी तयार केलेले वाफे पूर्णतः नष्ट झाल्याचे आढळून आले. तसेच अनेक शेतकऱ्यांचा काढणीला आलेला पावसाळी डाळिंबाच्या बागा, मका, ज्वारी या पिकाचे देखील नुकसान झाले आहे. एकीकडे देशातील उद्योगपतींनी करोडो रूपयांचे घोटाळे करून शासनाचे लाखो करोडो रुपये बुडवले असून देशाचा पोशिंदा शेतकरी राजा अडचणीत असताना प्रशासन पंचनामे करण्यासाठी टाळाटाळ करत असेल तर शिवसेना ते पंचनामे प्रशासनाला करण्यास भाग पाडेल व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यास मदत करेल.असे आश्र्वासन याप्रसंगी दिले.

त्यांनी परिसरातील दहा ते पंधरा गावांना भेटी दिल्या याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, जिल्हा समन्वयक किशोर वाघ, उपजिल्हाप्रमुख हिम्मत साबळे, तालुकाप्रमुख पंकज मराठे, कैलास ठाकरे, धुळे विधानसभा क्षेत्र प्रमुख भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, छोटू माळी, शिवसेना पिंपळनेर तालुका प्रमुख कैलास ठाकरे, प.स.स.राजधर देसले, विधानसभा प्रमुख भरत मोरे, मुकेश शिंदे, युवासेना तालुका प्रमुख रमेश शिंदे, हिम्मत सोनवणे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# दुसाने येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

**लाभार्थ्यांना विविध लाभाचे झाले वाटप**

**धुळे । प्रतिनिधी**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रेचे देशभरात आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्र्वभूमीवर आज विकसित भारत संकल्प यात्रा साक्री तालुक्यातील ग्रामपंचायत, दुसाने येथे उत्साहात संपन्न झाली.

केंद्र सरकारच्या प्रमुख योजनांचा लाभ लक्षीत घटकापर्यंत वेळेत पोहचावा यासाठी केंद्र सरकारकडून विकसित संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेले मात्र अद्याप ज्यांना लाभ मिळू न शकलेल्या पात्रताधारक व्यक्तिंना केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांची माहिती या एलईडी व्हॅनमार्फत देण्यात येत आहे. आहे. तसेच पात्र लाभार्थ्यांकडून विविध योजनांचे अर्ज भरुन घेण्यात येत आहे. दुसाने येथे झालेल्या कार्यक्रमात मान्यवराच्या उपस्थित लाभार्थ्यांना बेबीकीट, पोषण आहार, आभा कार्ड, पंतप्रधान आवास योजना मंजूरी आदेश, उज्वला गॅस मजुरी आदेशाचे वाटप करण्यात आले. तसेच नागरिकांची आरोग्य तपासणीही करण्यात आली. यावेळी या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे सदस्य पोपटराव सोनवणे, पंचायत समिती सदस्य रविंद्रराव खैरनार, सरपंच सुशिलाबाई ठाकरे यांच्यासह ग्रामस्थ व लाभार्थी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# घोडीसगाव-आबाडपाडा येथे आरोग्य तपासणी शिबिर

**शिरपूर ।** विश्र्व मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे घोडीसगाव-आबाडपाडा व गावात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येवून शिबिरात एकूण ५८ रुग्णांची तपासणी करून त्यांना डॉक्टरांच्या सल्लयानुसार मोफत औषधी देण्यात आली. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामी डॉ. निनाद हर्षद शाह (एम.डी. मेडिसिन), डॉ. एस. यांनी आरोग्य निदान केले. दिव्यांग राजेंद्र खैरनार (फार्मासिस्ट) यांनी औषध वितरण केले.

## न्यूज कॉलम

### मुल्हेर चौफुलीवर ९ लाखांचा गुटखा जप्त

**नाशिक ।** गुजरातहून महाराष्ट्रात चोरट्यामार्गाने आलेला ८ लाख ७८ हजार ५८० रुपयांचा गुटखा जायखेडा पोलिसांनी ताहाराबाद सटाणा रस्त्यावरील मुल्हेर चौफुलीवर जप्त केला. मारोती कंपनीची (एमएच ४१/ एम २३६५) ब्रिझा संशयित गाडी थांबवून तपासली असता त्यात पानमसाला गुटखा भरलेले पोते दिसून आले. याप्रकरणी शाहरुख रफिक तांबोळी याला ताब्यात घेतले आहे. ८ लाख ७८ हजार ५८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

### भरधाव ट्रकची एकास धडक, गुन्हा दाखल

**धुळे ।** मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर शिरपूर तालुक्यातील हाडाखेड तपासणी नाक्याजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने महामार्गावर उभे असलेले जगदीशचंद्र रामकिसन तेली (वय ४२, रा. राजस्थान) यांना धडक दिली. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी शिरपूर तालुका पोलिस ठाण्यात अज्ञात ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल झाला.

### पुणे- नाशिक महामार्गावर अपघातात मृत्यू

**नाशिक ।** आंबेगाव तालुक्यातील मंचर शहराजवळ असणाऱ्या पुणे-नाशिक महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात जायखेडा (ता.बागलाण) येथील एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तिघा जखमींवर रुग्णालयात तर २ जखमींवर खासगी रूग्णालयात उपचार सुरु आहेत. टेम्पोला पाठीमागून धडक दिल्याने हा अपघात झाला आहे. पंकज खंडू जगताप, मधुकर तुकाराम अहिरे (वय ५२), शांताराम संभाजी आहिरे (वय ५०) सर्व रा. जायखेडा अशी मृतांची नावे आहेत.

# अंनिस पिंपळनेरतर्फे महात्मा फुलेंना अभिवादन

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



येथील अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्ताने अभिवादन करण्यात आले.अंनिस पिंपळनेरचे उपाध्यक्ष व्ही एन जिरे पाटील व महिला सदस्य प्रा एम डी माळी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा मांडतांना प्रा डी टी पाटील त्यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली तर अनिस महिला साथी श्रीमती अमिता बच्छाव व श्रीमती ललिता जाधव यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यावर स्वलिखित कविता सादर करून ज्योतिबाच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी अनिस चे उपाध्यक्ष देविदास नेरकर, प्रधान सचिव शिरीष कुवर, देविदास पाटील, प्रदीप भामरे, डी डी महाले, महिला कार्यवाह मनीषा भदाणे, छाया वाडेकर, भरत बागुल उपस्थित होते.अनिस चे जिल्हा कार्यवाह प्रा शिवप्रसाद शेवाळे यांनी सूत्रसंचालन केले तर अनिस जिल्हा प्रधान सचिव सुभाष जगताप यांनी आभार मानले.

# सावळदे येथे महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी साजरी

**शिरपूर ।** तालुक्यातील सावळदे येथे आर. सी.पटेल माध्यमिक विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

मुख्याध्यापिका सौ.एन.पी.देवरे व ज्येष्ठ शिक्षक पी.एच.माळी यांनी प्रतिमेचे पूजन करून विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्याची ओळख करून दिली. यावेळी विद्यार्थ्यांनीही महात्मा फुले यांच्या विषयी आपल्या मनोगतातून माहिती दिली. ज्येष्ठ शिक्षक व्ही.बी.गाढवे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. एस.एल.भील यांनी प्रास्ताविक केले. एम. एल.जाधव यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेत युवक व विद्यार्थ्यांचा पक्ष प्रवेश



**धुळे । प्रतिनिधी**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या विचारांना प्रभावीत होऊन धुळे शहरातील विविध भागातील तरुणांनी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. येणाऱ्या महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने प्रत्येक भागात मनविसे तर्फे युवक व विद्यार्थी यांचा पक्ष प्रवेश करून संघटना बांधणी मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे,त्याचाच एक भाग म्हणून या प्रवेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन मनविसे शहराध्यक्ष विठ्ठल पगारे, संकेत सोनार, विकी वाघ आदींनी केले होते.



# हिंदवी स्वराज्य यात्रेच्या रथाचे स्वागत

**धुळे । प्रतिनिधी**

३५० शिवराज्याभिषेक निमित्त अ.भा.वि.प.कडून रायगड ते दिल्लीपर्यंत हिंदवी स्वराज्य यात्रेचा रथ काढण्यात येत असून त्यांचे दि ३० रोजी सायंकाळी ७ वाजता धुळे मार्गे दिल्लीला रवाना होणार झाला. त्यासाठी ३५० शिवराज्याभिषेक लोकोत्सव समिती तर्फे धुळे येथील शिवतीर्थ जवळ त्या हिंदवी स्वराज्य यात्रेच रथाचे मोठ्या ढोल ताशांच्या गजरात फुलांचा वर्षाव करीत त्या रथाचे स्वागत करण्यात आले.

त्या हिंदवी स्वराज्य यात्रेच रथाचे शिवतीर्थ ते महाराणा प्रताप पुतळा, स्वस्तिक चौक पर्यंत नाचत गाजत समिती सदस्य व अभाविप चे तरूण तरुणी कार्यकर्ते यांनी पदयात्रा काढली. तसेच मध्येच जोरात पाऊस आला तरी हि कोणी न थांबता पदयात्रा भर पावसात स्वस्तिक चौकातील महाराणा प्रताप पुतळा येथे आली व कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी या कार्यक्रमात ३५० वे शिवराज्याभिषेक लोकोत्सव समिती धुळे जिल्हा संयोजक प्रा.रविंद्र ओंकार निकम, जिल्हा सचिव प्रा.विनायकजी पुंडलिक चव्हाण, सदस्य पवनजी अग्रवाल, प्रा.भरतजी काळे, भैय्यासाहेबजी सिसोदिया, रा.स्व.संघ जिल्हा कार्यवाह राजेश पाटील, मनोज पाटील, नितीन गुरव, राकेश भद्रे, योगेश थोरात व सर्व शिवभक्त कार्यकर्ते उपस्थित होते.

# महात्मा ज्योतिबा फुले स्मृतीस अभिवादन

**धुळे ।** अ. शि. मंडळ धुळे संचलित शिक्षण महर्षी प्राचार्य भाईसाहेब गो.हु महाजन गुरुकुल विद्यालय यशवंत नगर धुळे महात्मा ज्योतिबा फुले स्मृती दिवस विनम्र अभिवादन करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा मंगला महाजन, अरुणकुमार महाजन, प्राचार्य अमरदिप महाजन,मुख्याध्यापक एल.जी.पाटोळे, यांनी महात्मा ज्योतिबा फुले स्मृतीदिनानिमित्त यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग येथे मध्यस्थता कक्षाचे उद्धघाटन संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**



जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, धुळे येथे आज जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या.एस.व्ही.स्वामी यांच्या शुभहस्ते मध्यस्थता कक्षाचे उद्धटन संपन्न झाले.

या कार्यक्रमास जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. आर.डी.जोशी, उपाध्यक्ष ॲड. मधुकर भिसे, ॲड.श्रीमती प्रभावती माळी, धुळे बार कंझुमर्स असोसिएनशचे अध्यक्ष ॲड. चंद्रकांत येशीराव, धुळे जिल्हा सरकार वकील ॲड. देवेन तंवर , केंद्र शासनाचे अधिवक्ता ॲड.समीर पंडीत आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,धुळे येथे माहे जून २०२२ मध्ये मध्यस्थता पॅनलची नियुक्ती करण्यात आली होती. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण, धुळे आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती एन.एन.देसाई व सदस्या श्रीमती. रसिका निकुंभ यांच्या प्रयत्नाने आज जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,धुळे येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या.एस.व्ही.स्वामी यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष न्या.संदीप स्वामी यांनी मध्यस्थता कक्षाची काळानुरुप गरज व त्यातील आव्हाने याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे धुळे जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष आर. डी.जोशी यांनी मध्यस्थता कक्षाचे नियुक्त सदस्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाप्रसंगी मध्यस्थता पॅनलचे नियुक्त सदस्य श्री.देशमुख, श्रीमती. वेलणकर, श्रीमती अग्रवाल, ड.सुधा जैन यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड.डी.डी. जोशी, ॲड.चव्हाण, ॲड.जाधव, ॲड.दिनेश गायकवाड तसेच इतर वकीलवृद उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,धुळे येथील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# भाजयुमो सोशल मीडिया आघाडीची कार्यकारणी जाहीर

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे शहरातील भाजपा युवा मोर्चा सध्या महाराष्ट्रात आघाडीवर आहे. यात महत्वाचा भाग असलेल्या सोशल मीडियाला या वेळी भक्कम पाया मिळाला आहे. त्या मुळे येणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर महत्वाची आघाडी किशन थोरात यांच्या हाती दिली आहे. त्या मुळे पक्षाला खंबीर साथ मिळाली आहे.

या वेळी तब्बल १५ सह संजोयक हे महानगर वर आहेत. त्या मुळे शहरातील प्रत्येक बूथ वर आता सोशल मीडिया महत्वाचा आहे. हे भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले आहे. त्यांनी सांगितल्या प्रमाणेच किशन थोरात यांनी कार्यात महत्वाचा पाया सांभाळला आहे. जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, भाजयुमो चे जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी, जिल्हा संघटन सरचिटणीस पंकज धात्रक, किशन थोरात, जितेंद्र चौटीया, यशवंत येवलेकर, आकाश परदेशी, पंकज धात्रक, चेतन मंडोरे यांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रदेत संयोजकांनी अभिनंदन केले.

# पटेल फार्मसी महाविद्यालयात मिशन साहसी अभियान संपन्न

**शिरपूर ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव युवती सभेअंतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान आणि मिशन साहसी अभियान यांचे एकत्रित उद्घाटन आर. सी. पटेल औषधनिर्माशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने एस.एम.पटेल ऑडिटोरियम येथे करण्यात आले.

आत्मनिर्भर युवती अभियान आणि मिशन साहसी अभियान उदघाटन प्रसंगी माजी नगराध्यक्ष संगीताताई देवरे, दामिनी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक छाया पाटील, जिल्हा विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. विवेकानंद चव्हाण, मिशन साहसी प्रशिक्षक रेशमा मराठे यांच्या हस्ते झाले.

# थाळनेर महाविद्यालयात जागतिक एड्स दिवस साजरा

**थाळनेर । प्रतिनिधी**



कै.अण्णासाहेब पितांबर शंकर वाडिले कला महाविद्यालयाच्या वतीने 'जागतिक एड्स दिवस' निमित्ताने अन्नपूर्णादेवी विद्याप्रसारक संस्थेचे सचिव डॉ. निळकंठ वाडिले यांच्या हस्ते कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. आर. जगताप हे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. विजय झुंजारराव यांनी मराठी विषयात पीएचडी (विद्यावाचस्पती) आणि डॉ.रघुनाथ सोनवणे यांनी राज्यशास्त्र विषयात पीएचडी (विद्यावाचस्पती) प्राप्त केल्याने संस्थेतर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सर्व उपस्थित मान्यवरांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजक मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. बी. अहिरे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन केले.

यावेळी माजी प्रभारी प्राचार्य डॉ. गिरीश गावित यांनी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिवस म्हणून का साजरा केला जातो यामागील भूमिका मांडली. मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. बी अहिरे यांनी डिजीटल बोर्डावर पी.पी.टी च्या माध्यमातून एड्स म्हणजे काय? त्याचा इतिहास, कारणे, लक्षणे, आणि शारीरिक व मानसिक आरोग्य कसे चांगले ठेवता येईल यावर उपाययोजना कोणत्या असाव्यात याविषयी मार्गदर्शन केले. तसेच थाळनेर ग्रामीण रुग्णालयातील समुपदेशक अमोल पाटील यांनी एड्स या रोगाचा प्रसार कसा होतो तसेच त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना कोणत्या असाव्यात याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजय झुंजारराव यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. आर. बी. अहिरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. गिरीश गावित, प्रा. एम. डी. रणदिवे, डॉ. टी. आर. शर्मा, प्रा. एच. बी. माळी, डॉ. आर. बी. अहीरे, प्रा. डॉ. आर. के. सोनवणे, प्रा.एस.एस. राठोड, नवनीत वाडीले, थाळनेर ग्रामीण रुग्णालयातील समुपदेशक अमोल पाटील व महिरे आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

# विद्याधन महाविद्यालयात एड्स दिनानिमित्त जनजागृती अभियान संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**



वलवाडी (धुळे): येथील विद्याधन महाविद्यालयात जागतिक एड्स दिनानिमित्त जन जागृतीपर अभियान राबविण्यात आले.

या प्रसंगी म्हसदी येथील डॉ. रमेश अहिरे यांनी एड्स जनजागृती काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन केले तसेच सोनगीर महाविद्यालयाचे प्रा. अनिल पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.बी. पवार हे उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी जागृती पाटील व विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. योगेश बोरसे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ललिता निकम यांनी केले एड्स दिनानिमित्त जनजागृती पर अभियान राबविल्या बद्दल संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. के.बी.पाटील संस्थेच्या अध्यक्षा सौ. शारदाताई पाटील व सचिव हर्षल पाटील यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशास्वितेसाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# धिर धरा, खचून जावू नका, आम्ही पूर्णपणे तुमच्या सोबत

## येवला व निफाड तालुक्यातील अवकाळीने झालेल्या नुकसानीची मंत्री छगन भुजबळ यांनी केली पाहणी












लासलगाव । वादळ, गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतपीकांचे अतोनात नुकसान झाले असून अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासनस्तवर विशेष निधीकरीता तसेच अवकाळीमुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी क्रॉप कव्हर योजना राबविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. आज येवला व निफाड तालुक्यातील वादळ, गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपीकांच्या नुकसानीची पाहणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी समवेत उपविभागीय अधिकारी येवला बाबासाहेब गाढवे, उपविभागीय अधिकारी निफाड हेमांगी पाटील, येवला तहसिलदार आबा महाजन, निफाड तहसिलदार शरद घोरपडे, येवला तालुका कृषी अधिकारी शुभम बेरड, निफाड तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ यावेळी म्हणाले, अवकाळीमुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे हे जलदगतीने करण्यात यावेत यात एकही बाधित शेतकरी सुटता कामा नये. बाधित शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शालेय शिक्षण फी माफीबाबतही योग्य निर्णय घेण्यात येणार आहे. बाधित क्षेत्राचा विचार करता पीक विम्याबाबत सुध्दा शासन स्तरावरून प्रयत्न करणार असल्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी शेतकऱ्यांना अश्र्वासित केले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक






# 'एड्स'प्रतिबंध जनजागृतीसाठी युवकांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी

## धुळ्यात एड्स जनजागृती रॅलीत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग






























धुळे
। नागरिकांमध्ये एड्स आजाराबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी प्रत्येक युवक व युवतींनी स्वयंस्फूर्तपणे पुढाकार घेऊन ब्रॅड ॲम्बेसेडर म्हणून समाजात जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी वेळी केले.महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत आज १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त धुळे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग व जिल्हा रुग्णालय, धुळे यांच्यातर्फे आयोजित प्रभात फेरीला जिल्हाधिकारी श्री. गोयल यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, धुळे महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. दत्ता देगांवकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. महेश भंडागे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक मुकुंद भट, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. योगेश पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी शीतल पाटील, समाज कल्याण महाविद्यालयाचे प्रा.गोपाळ निंबाळकर, रोटरी क्लबचे दिपक अहिरे, एनएसएसचे के.एम.बोरसे, नेहरु युवा केंद्राचे अशोक मेघवाल, विहान संस्थेच्या श्रीमती आशा माळी, सप्तश्रृंगी बहुउद्देशिय संस्थेच्या अध्यक्षा मिनाताई भोसले, प्रेरणा बहुउद्देशिय संस्थेचे सचिव निलु पार्वती जोगी आदी उपास्थित होते.

संकलन : दिपक वाघ